Desktop:/Letter10(K.Ahire)

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक – ४२२ ००२

(महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये)

क्रमांक / नविनि / नवि / 32 / 2025

## जाहीर सुचना

दि. 12/12/2025

ज्याअर्थी, नाशिक महानगरपालिका क्षेत्राची सुधारित विकास योजना महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक टिपीएस-१११६/प्र.क्र.१४०(अ) दि. ०९/०१/२०१७ व क्रमांक टिपीएस-१११६/प्र.क्र.१४०(ब) दि. ०९/०१/२०१७ व क्रमांक टिपीएस-११६/प्र.क्र.१४०(अ) दि. ०१/०६/२०१७ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये भागशः मंजुर केलेली असून सदरची विकास योजना दि. ०९/०२/२०१७ पासून अंमलात आलेली आहे.

सदर सुधारित मंजुर योजनेत शासनाचे पुर्नप्रसिध्द क्र. १११६/प्र.क्र.-१४०(ब)२०१६/नवि-१, दि. ३१/१२/२०१८ अन्वये दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. वर नमूद केलेली सुधारित मंजूर विकास योजना आणि शुध्दीपत्रकातील दुरुस्त्या यांचा एकत्रितपणे येथून पुढे **"उक्त विकास आराखडा"** असा उल्लेख केला आहे.

आणि ज्याअर्थी उक्त मंजुर विकास आराखड्यात मौजे गंगापुर येथील स.नं. ४६/१ व ४६/२/१ पै. (सि.स.नं. १६१९) ही मिळकत १८.०० मी. रुंद उत्तर-दक्षिण तसेच पुर्व-पश्चिम विकास योजना रस्त्याने बाधीत होत आहे. प्रस्तावातील रस्त्याची सद्यस्थिती दर्शक पी.टी.शीट नकाशा करणेत आला आहे. पी.टी.शीट नकाशात दर्शविलेल्यानुसार पुर्व-पश्चिम १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता वगळण्याची मागणी आहे. सदर जागेलगत उत्तर दिशेला कॅनाल असून सदर कॅनालपलीकडे विकास योजनेनुसार २४.०० मी. रुंद विकास योजना रस्ता आहे. १८.०० मी. रुंदीचा विकास योजना रस्ता जागेवर अद्याप अस्तित्वात नाही. मागणीप्रमाणे १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता पी.टी. शीटमध्ये दर्शविल्यानुसार कॅनाल क्रॉस करुन २४.०० मी. रुंद विकास योजना रस्त्यास जोडला जाऊ शकतो. त्यामुळे भविष्यातील वाहतूकीचे नियंत्रणास अडचण निर्माण होणार नाही. कॅनालची जागा पाटबंधारे विभागाने दि. २०/०२/१९९८ रोजी करारनाम्याव्दारे महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेली आहे. तसेच १८.०० मी. रुंद वि.यो. रस्ता कॅनॉलचे जागेतून २४.०० मी. रुंद वि.यो. रस्त्यास जोडण्यास पाटबंधारे विभागाचा ना-हरकत दाखला जा.क्र.नापावि/भूसंपादन/७६६२/सन२०२५, दि. ३०/०९/२०२५ अन्वये मिळालेला आहे. कॅनाल लगत पुर्व-पश्चिम १८.०० मी. रुंद व किमान १९०.०० मी. लांबीचा विकास योजना रस्ता वगळल्यास मनपास सदर रस्त्याचा मोबदला द्यावा लागणार नाही. सदर पुर्व-पश्चिम कॅनाल लगत १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता वगळल्यास सदर रस्ता विकसनकामी होणाऱ्या खर्चाची मनपाची बचत होईल. तसेच २४.०० मी. रुंद विकास योजना रस्त्यास जोडणारा पश्चिम बाजुकडील १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याचे विकासनाचा खर्च कमी होईल.

सदरचा पुर्व-पश्चिम १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता हे वगळून हे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणेसाठी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस महासभेने ठराव क्र. ५९१, दि. २८/११/२०२५ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, नाशिक महानगरपालिकेने वरील ठरावाचा विचार करुन, उक्त विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये खालील परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे सार्वजनिक सुविधाचे (विकास योजना रस्त्याचे) आरक्षणात किरकोळ फेरबदल करण्याचे ठरविले आहे.

### परिशिष्ट

| अ.क्र. | आरक्षण क्र. | जागेचा तपशिल | नाशिक शहराच्या सुधारित मंजूर विकास आराखडयानुसार सद्यस्थितीतील प्रयोजन | महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये करणेचा नियोजित किरकोळ फेरबदल |
|---|---|---|---|---|
| १ | | मौजे गंगापुर येथील स.नं. ४६/१ व ४६/२/१ पै. (सि.स.नं. १६१९) | १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता | पुर्व-पश्चिम १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता वगळणे व सदरचे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ठ करणे; उत्तर-दक्षिण १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता उत्तरेकडील २४.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याला जोडणे. |

सदरहू फेरबदल करणेबाबतच्या भाग नकाशाची प्रमाणित केलेली प्रत नाशिक महानगरपालिकेच्या राजीव गांधी भवन, शरणपूर रोड येथील प्रशासकीय कार्यालयात जनतेच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेत ठेवली असून जनतेस योग्य ती फी भरुन उपलब्ध होऊ शकेल.

ज्या नागरिकांना सदरहू नियोजित फेरबदलांबाबत हरकती/सुचना द्यावयाच्या असतील त्यांनी ही नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे कार्यालयात, कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात सादर करावयात. वरील मुदतीनंतर आलेल्या सुचना/हरकती यांचा विचार केला जाणार नाही.

मनिषा खत्री (भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक

सदरची सुचना नाशिक महानगरपालिकेच्या www/nmcnashik.gov.in या वेबसाईटवर देखील उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.